पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८.

मा. ह प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक - 3

स भा वृ त्तां त

दिनांक - ५/१०/२०१७ वेळ. दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समिती मासिक सभा गुरुवार दि. ५/१०/२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयातील सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा. नगरसदस्य / नगरसदस्या उपस्थित होते.

१) **मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत** **सभापती**

२) मा.सुलक्षणा राजू धर

३) मा.शाम गणपतराव लांडे

४) मा.सुजाता सुनिल पालांडे

५) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

८) मा.सोनवणे शारदा हिरेन

९) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.संजय घुबे (कार्यकारी अभियंता स्था), श्री.भोसले संजय (कार्यकारी अभियंता जल:निसारण), श्री.शिरीष पोरेडी (उप.अभियंता स्था), श्री.विजयसिंह भोसले (उप अभियंता स्था), श्री.धुमाळ दिलीप (उप. अभियंता वि), श्री.जावळे आर.के (उप. अभियंता पापु), श्री.दवंडे शशिकांत (उप अभियंता पा.पु.), श्री.विशाल कांबळे (उप. अभियंता जलनि:सारण), श्री.खोंद्रे एम.आय. (उप अभियंता झोनिपू/स्था/), श्री. सुनिलदत्त नरोटे (उप.अभियंता स्थापत्य/उद्यान), श्री.संतोष लांडगे (वृक्षसंवर्धन उद्यान सहाय्यक ), श्री. ज्ञानेश्वर सासवडकर (सहा.आरोग्य अधिकारी), श्री. चंद्रकांत मोरे (हॉटी सुपरवायझर), श्री.शिरसाठ आर.जी. (उद्यान सहाय्यक), श्री.जे.व्ही.पटेल (उद्यान निरीक्षक) श्री.शहाजी माळी (मुख्य आरोग्य निरीक्षक), श्री.चौहान सुनिल (आ.नि), श्री.संजय मानमोडे (आ.नि), श्री.इंगेवाड सतिश, (आ.नि), श्रीम. रश्मि तुंडलवार (आ.नि), इ.अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती –** उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे. दि. ७/९/२०१७ (कार्यक्रमपत्रिका क्र.२) रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१ कै.सौ. शंकुतलाबाई आनंदराव शितोळे प्राथमिक विद्यामंदिर शाळेशेजारील महानगरपालिकेचे सुलभ शौचालय काढून टाकणेबाबत - उषा उर्फ माई ढोरे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२ प्रभाग क्र.२० कासारवाडी भागातील शिवप्रेमी मित्र मंडळ येथील टॉयलेट ब्लॉक (मुतारी) पाडून नविन बांधणेबाबत - मा.शाम लांडे, मा. सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव

विषय क्र.३ प्रभाग क्र.२० कासारवाडी मुंबई –पुणे हायवे लगत येथील जय महाराष्ट्र चौकाचे सुशोभीकरण करणेबाबत - मा.शाम लांडे व मा. सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव

विषय क्र.४ प्रभाग क्र.२० कासारवाडी भागातील जुने व नादुरुस्त असलेले शौचालय पाडून नविन सुलभ शौचालय उभारणेबाबत - मा.शाम लांडे, मा. सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव

विषय क्र.५ प्रभाग क्र.२० मधील फुलेनगर झोपडपट्टी व लांडेवाडी झोपडपट्टी या नांवामधील झोपडपट्टी शब्द वगळून त्याऐवजी वसाहत असा शब्द वापरणेबाबत - मा. सुजाता पालांडे, मा.उषा उर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्र.११ विषय क्र.१
दि. ५/१०/२०१७ विभाग – स्थापत्य
सुचक:- मा.उषा उर्फ माई ढोरे अनुमोदक:- मा.सुजाता पालांडे
संदर्भ:- मा.उषा उर्फ माई ढोरे,मा.सुजाता पालांडे यांचा दि. ५/१०/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३२ मधील सर्व्हे नं. १२.२.१४ वेताळ महाराज सोसायटी आनंदनगर सांगवी पुणे ४११ ०२७ या ठिकाणी कै. सौ. शंकुतलाबाई आनंदराव शितोळे प्राथमिक विद्यामंदिर शाळा आहे. त्या शेजारी महानगरपालिकेचे सुलभ शौचालय आहे. त्याचा कोणीही वापर करत नाही. व त्याचे ड्रेनेज फुटलेले असून शाळेच्या आवारात पाणी जात असते, त्यामुळे शालेय परिसरात दूर्गंधी पसरली आहे. त्यामुळे शाळेतील मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तरी महानगरपालिकेचे शाळे शेजारील सुलभ शौचालय काढून टाकणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.१२ विषय क्र.२
दि. ५/१०/२०१७ विभाग – स्थापत्य
सुचक:- मा.शाम लांडे अनुमोदक:- मा.सुलक्षणा धर
संदर्भ:- मा.शाम लांडे व मा.सुलक्षणा धर यांचा दि. ५/१०/२०१७ चा प्रस्ताव

प्र.क्र.२० मध्ये कासारवाडी भागातील शिवप्रेमी मित्र मंडळ ( मराठी शाळे जवळ ) येथे असणारे टॉयलेट ब्लॉक ( मुतारी ) पडलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. सदरील भाग हा दाट लोकवस्तीचा असून या भागात पडलेल्या अवस्थेत असलेले टॉयलेट ब्लॉक (मुतारी) त्वरीत नव्याने बांधणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र. १३ विषय क्र.३
दि. ५/१०/२०१७ विभाग – स्थापत्य
सुचक:- मा. शाम लांडे अनुमोदक:- मा.सुलक्षणा धर
संदर्भ:- मा.शाम लांडे व मा. सुलक्षणा धर यांचा दि. ५/१०/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० कासारवाडी मुख्य रस्ता येथे असणा-या जय महाराष्ट्र चौकाचे सुशोभीकरण करणेकामी मुंबई-पुणे हायवे लगत हा चौक असून, कासारवाडी मधील प्रमुख चौक आहे, सदर चौकाचे व आस-पास असणा-या भागाचे सुशोभिकरण केल्यास पिंपरी चिंचवड शहराचे व कासारवाडी गावाच्या सौंदर्यात भर पडेल. तरी सदरील चौकाचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. १४

दि. ५/१०/२०१७

सुचकः- मा. शाम लांडे

विषय क्र.४

विभाग – स्थापत्य

अनुमोदकः- मा.सुलक्षणा धर

संदर्भः- मा.शाम लांडे व मा. सुलक्षणा धर यांचा दि. ५/१०/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० मध्ये कासारवाडी भागातील विद्या विकास प्रशाले समोरील शौचालय, जुना मुंबई – पुणे हायवे लगत अमिको ब्रदर्स येथील शौचालय व कासारवाडी करसंकलन कार्यालय समोरील शौचालय येथे असणारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शौचालय जुने व नादुरुस्त असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. सदरील भाग हा दाट लोकवस्तीचा असून या भागात अंदाजे १५००० – २०००० लोकसंख्या आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सदरील भागातील जुने व नादुरुस्त शौचालय पाडून त्या ठिकाणी नवीन सुलभ शौचालय उभारणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र. १५

दि. ५/१०/२०१७

सुचकः- मा.सुजाता पालांडे

विषय क्र.५

विभाग – स्थापत्य

अनुमोदकः- मा.उषा उर्फ माई ढोरे

संदर्भः- मा. सुजाता पालांडे, मा. उषा उर्फ माई ढोरे यांचा दि. ५/१०/२०१७ चा प्रस्ताव

प्र.क्र.२० मधील फुलेनगर झोपडपट्टी व लांडेवाडी झोपडपट्टी या नावांमधील झोपडपट्टी शब्द वगळून त्याऐवजी वसाहत असा शब्द वापरुन या दुरुस्तीसह **"फुलेनगर वसाहत व लांडेवाडी वसाहत"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

Aumble

(मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे)

सभापती, ह प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षेका/सभा//कावि/ १६ /२०१७

दिनांकः- ९ / १० / २०१७

प्रशासन अधिकारी

तथा

सचिव (सभाशाखा)

ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर